# समग्र शिक्षा, पंचायत समिती भिवंडी,
# जिल्हा परिषद ठाणे

**कष्टाचे समाधान.**

जिल्हा परिषद ठाणे पंचायत समिती भिवंडी अंतर्गत जिल्हा परिषद शाळा उंबरखांड येथील श्री रामदास निरगुडे यांना तीन मुले व तीनही मुले कर्णदोष प्रवर्गातील आहेत व यातील हा सर्वात छोटा मुलगा कु सार्थक रामदास निरगुडे वय वर्ष ५ हा जेव्हा झाला तेव्हा त्याच्या पालकांना याबाबत थोडी फार कल्पना होती त्यामुळे त्याच्या श्रवणाच्या बाबतीत काही टेस्ट केल्या परिस्थीती बेताची असल्यामुळे त्यांना मार्ग अवघड झाले. त्यांचे मोठे भाऊ जिल्हा परिषद शाळा उंबरखांड येथे शिकत आहेत त्यांच्याकडूनच याची माहिती मिळाली. तेव्हा शाळेतील श्री बिडवी सर यांनी त्या पालकांना शाळेत बोलावले व त्या बाबत चौकशी केली. शाळेतील शिक्षकांनी समग्र शिक्षा समावेश शिक्षण विद्यार्थी कर्णबधीर प्रवर्गतील असून त्याला ऐकू व बोलण्यात अडचणी येत होती.सोबत त्याची परिस्थिती यामुळे त्यावर मात करण्यास आव्हाने येत होती. AIDP या योजनेअंतर्गत चौकशी केली असता ती योजना ज्युपिटर हॉस्पिटल येथे असण्याने तेथे जाऊन विद्यार्थ्याला तपासणी साठी नेले. सोबत शाळेतील शिक्षक पालक विशेष शिक्षक होते. दिनांक ०७/११/२०२३ रो Patient's First हे ब्रीद वाक्य असलेले जुपिटर हॉस्पिटलचे १०० हून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया केलेले असे सुप्रसिद्ध डॉक्टर श्री प्रदीप उप्पल व त्यांच्या टीमने भिवंडी तालुक्यातील अति ग्रामीण भागातील उंबरखांड (पाच्छापूर)येथील या विद्यार्थ्याला प्रथम तपासणी साठी नेले. विद्यार्थ्याच्या सर्व टेस्ट तेथे त्यांच्या सहकार्याने करून मिळाल्या. सोबत शाळेतील शिक्षक आदिवासी समाजातील मोलमजुरी करणाऱ्या श्री. रामदास व छाया निरगुडे दाम्पत्याचे कु. सार्थक रामदास निरगुडे या पाच वर्षे मुलाची दि.७/११/२०२३रोजी कॉकलिया इम्प्लांट सर्जरी करण्यात आली.

आजच्या या त्यांच्या परिस्थीतीचा विचार न करता त्याच्या या आयुष्याला नवीन वळण लाभले. ADIP या स्कीम मधून ऑपरेशन यशस्वी रित्या केलेले आहे. सदर ऑपरेशनसाठी जवळपास १० ते १२ लाख खर्च येतो तेच ऑपरेशन विनामूल्य केले . त्याबद्दल मुलांचे ऑपरेशन करण्यासाठी ज्युपिटर हॉस्पिटल मधील डॉ.प्रदीप उप्पल सर,सोनल सावंत मॅडम व त्यांचे सहकारी यांचे खूप मोलाचे सहकार्य लाभले त्यांचे खूप खूप आभार.तसेच जिल्हा परिषद ठाणे समग्र शिक्षा अंतर्गत जिल्हा शिक्षणाधिकरी प्रा .मा. कारेकर साहेब जिल्हा समन्वयक मा.अनिल कुऱ्हाडे सर मा.गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भिवंडी, श्री.संजयजी अस्वले साहेब ,मा.केंद्रप्रमुख श्री. विनायक भालेराव सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. गणेश बिडवी सर जिल्हा परिषद शाळा उंबरखांड समग्र शिक्षा समावेशित शिक्षण पंचायत समिती भिवंडी अंतर्गत समावेश शिक्षणची संपूर्ण टीम यांनी सतत पाठपुरावा केल्याने श्री. रामदास निरगुडे यांच्या कुटुंबातील तीनही मुले कर्णबधिर असताना शेवटच्या मुलगा सार्थक यांचे आज ऑपरेशन यशस्वी झाले आहे. खूप खूप आभार.

श्रीम निलम पिसाळ, विशेषतज्ञ IE, पं.स. भिवंडी